# लेमदेव पाटील महाविद्यालय मांढळ

## विषय : मराठी साहित्य (ऐच्छिक)

## वर्ग : बी.ए. पाचवे सत्र

## घटक – २

# “दलित साहित्य वेदना व विद्रोह”

सादरकर्ता: प्रा.जी.एम.भुजाडे
(मराठी विभाग)

# दलित साहित्य वेदना व विद्रोह





१) दलितांचे व बहुजनाचे नायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टो. १९५६ मध्ये नागपूर येथील दीक्षाभूमीत धर्मांतर केले, व दलित बांधवांमध्ये समाज जागृती केली.

२) दलित साहित्य ही चळवळ सामाजिक अन्यायाविरुध्द व शोषणाविरुध्द आहे.

३) संवर्ण व्यवस्थेने हजारो वर्षापासून दलितांना अन्न, वस्त्र, निवारा या पासून वंचित ठेवले. त्या समाजाला स्वतंत्र,धिकार, समता, न्याय, बंधुता, हक्क व अधिकार डॉ. बाबासाहेव आंबेडकर यांनी मिळवून दिले.

४) प्रा. केशव मेश्राम यांनी महाबळेश्वर येथे भरलेल्या साहित्य संमेलनातील परी संवादात ते “दलित” या वर्गा संबंधी म्हणतात. हजारो वर्ष ज्यांच्यावर अन्याय झाला अशा अस्पृशांना दलित म्हटले जाते व त्याच वर्गातील लेखकांनी निर्माण केलेल्या साहित्यास दलित साहित्य म्हणावे.

५) “बाबुराव बागुल”- “दलित साहित्य आजचे क्रांती विज्ञान” या ग्रंथात त्यांनी दलित या शब्दाचा अर्थ नव्याने मांडून नवा इतिहास रचण्याचे आव्हान केले आहे.

६) दलित साहित्याच्या प्रेरणा बुद्ध, फुले, चावकी, आंबेडकर आहे.

७) दलित साहित्याचे वैशिष्टे, वेदना, विद्रोह व नकार आहे.

८) बाबासाहेबांनी अस्पृशाच्या सुरु केलेला “मुक्तीसंग्राम” मानवतेच्या प्रतिष्ठेसाठी होता. त्याने वर्ण व्यवस्थेविरुद्ध पिळवणूक करणाऱ्या हिंदू धर्मा विरुद्ध आपला लढा निकराणे चालवला.शेवटी लाखो अनुयायांना सोबत घेऊन बोद्ध धर्माचा स्वीकार केला. या धर्मांतरामुळे त्यांनी संस्कृतीच्या क्रांतीची सुरुवात केली. दलितांना जिवंत संवेदनशील माने दिली.

९) बाबासाहेबांनी आपली साहित्यविषयक भूमिका मांडतांना आपण आपल्या जीवनाकडे, कर्तव्य व धर्म-संस्कृतीकडे दुर्लक्ष करीत अहो आपणा अंध:पतानाच्या, अवनतीच्या मार्गावरून जात आहोत, म्हणून शेवटी ते साहित्यीकांना उद्देशून म्हणतात, की उदात्त जीवनमूल्ये व सांस्कृतिक मूल्ये यांचा आपल्या साहित्यप्रकारातून अविष्कार करा. आपली लेखणी आकुंचित करू नका तिला विशाल बनवा आपली वाणी चार भिंत आड न

१०) अण्णाभाऊ साठे : ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरली आहे. मराठी भाषा व साहित्य “दलित” साहित्य म्हणून स्वतंत्र विभागण्यात आले.

११) दलित साहित्याच्या वेदनेचे आदिरूप संत चोखामेळा आहे.

१२) चोखोबा अन्यायाविरुद्ध व चालीरितीविरुद्ध इतर संताप्रमाणे दंड धोपटून उभे राहिले नाही, त्यांनी दंभावर, ढोंगावर, शब्दाचे फटकारे आपल्या अभंगातून ओढले आहे.

१३) "धाव-धाव विठू आता चालू नको मंद" असा विठ्ठलाचा धावा ते करतात त्यांना बडवे मारतात. विठ्ठलाचा हार चोखोबाच्या गळयात दिसताच चोखोबाला बडवून काढतात.